हेन्री फोर्डची पहिली रेस



लेखिका: मोनिका कुलिंग

चित्रे: रिचर्ड वाज

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक

हेन्री फोर्डची पहिली रेस





हेन्री फोर्डला गाडी चालवायला खुप आवडे.
त्याला शहरात गाडी चालवायला मजा यायची.
त्याला गाडीवर पाहिले की लोक एकदम उत्साही व्हायचे.

“तो बघ वेडा हेन्री! पुन्हा बिन घोड्याची गाडी घेऊन चालला आहे,” लोक ओरडत.

त्याला पाहायला बायका धावत बाहेर यायच्या.

त्याला चुकवायला पुरुष रस्त्याच्या बाजूला उभे राहत.


कुत्री भुंकत मागे पळायची.

घोड्यांचे खिंकाळणे सुरु व्हायचे.

हेन्रीला शहरात गाडी चालवायला खूप मजा यायची.







हेन्रीने स्वत:ची गाडी स्वत: बनवली होती.

ती पेट्रोलवर चालायची.

त्या गाडीला ब्रेक नव्हते.


गाडी थांबवायची असेल तर तो इंजिन बंद करायचा.

आणि उडी मारून बाहेर पडायचा.

हेन्री गाडी खांबाला अगदी घोड्यासारखेच दोराने बांधून ठेवायचा. म्हणजे मग गाडी उलटण्याची भीती नसायची.







सर्वांना वाटत असे की हेन्रीने पुन्हा घोडा-गाडी चालवावी.

पण हेन्रीला गाड्या खूप आवडायच्या. त्याला गाडी चालवायला खूप मजा यायची.

आणि गाड्या तयार करायलाही त्याला खुप आवडे.


आणखीनही काही लोक गाड्या बनवायचे.

परंतु त्या खूप महागड्या होत्या.

आणि त्या गाड्यांना सतत दुरुस्ती लागायची.

बऱ्याच लोकांना गाडी कशी चालवायची ते माहित नसल्यामुळे ते ड्रायव्हर ठेवीत.

फक्त श्रीमंत लोकांना गाडी घेणे परवडायचे.



हेन्रीचे एक स्वप्न होते.

त्याला अशी गाडी बनवायची होती की जी सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात असेल.

त्याची स्वप्नातील गाडी तयार करायला त्याला पैसे लागणार होते.

पण पैसे उभे तरी कसे करायचे?

म्हणून त्याने रेसमध्ये भाग घेण्याचे ठरवले.

त्यांनी त्याच्या उभ्या आयुष्यात कधीच रेसमध्ये भाग घेतला नव्हता.





गाड्यांच्या शर्यती हा नवीन खेळ होता.

लोक नटून थटून रेस पाहायला यायचे.

जी गाडी वेगाने धावायची त्या गाडीने रेस जिंकावी यासाठी लोक चीत्कारायचे.





“मी रेस जिंकलो तर,” तो क्लारा-आपल्या पत्नीला म्हणाला, “तर मला नवीन गाडी बनवता येईल.”

हेन्री आणि मेकॅनिक स्पायडर हफ्फ कामाला लागले.

त्यांनी सव्वीस हॉर्सपॉवरचे इंजिन रेसिंगच्या गाडीला लावले.

एक हॉर्सपॉवर म्हणजे एका घोड्याची गाडी ओढण्याची ताकद.

म्हणजे हेन्रीची गाडी घोड्याला एका सेकंदात हरवू शकणार होते.






लोक हेन्रीला खूप हसले.

“तू डेअरडेव्हिलला कधीच हरवू शकणार नाही,” लोक म्हणाले.

तो डेअरडेव्हिल-धाडसी माणूस म्हणजे अलेक्झांडर विंटन.

तो अमेरिकेचा रेसिंग चॅम्पियन होता.





मी त्याला नक्की हरवेन,” हेन्री म्हणाला.

“माझी गाडी जास्त चांगली आहे.”

क्लाराने मान डोलावून संमती दिली.


तिला हेन्रीकडून फक्त एकच अपेक्षा होती की त्याने सुरक्षित गाडी चालवावी.


गाड्यांच्या स्पर्धा मिशिगनमध्ये डेट्रोइट शहराजवळ आयोजित केल्या जायच्या.

हेन्री दहा मैल लांबीच्या स्पर्धेत सहभागी झाला.

त्यासाठी एकहजार डॉलर बक्षिस होते.

जवळजवळ आठ हजार प्रेक्षक स्पर्धा बघण्यासाठी जमा झाले होते.





दहा मैलाची शर्यंत त्यादिवशी सगळ्यात शेवटी होती.

हेन्री आणि विंटन असे दोनच स्पर्धक मैदानात होते.

डेअरडेव्हिलने हेन्रीकडे बघून स्मितहास्य केले आणि टोपीने अभिवादन केले.

हेन्रीनेही त्याला टोपीने अभिवादन केले आणि त्याच्याकडे बघून स्मितहास्य केले.






"ऑन युवर मार्कस," शर्यंत सुरु करणारा माणूस जोराने ओरडला.

हेन्रीने स्टेअरिंग पकडले आणि "इंजिन चालू कर," असे ओरडला. स्पायडरने इंजिन सुरु केले.

हेन्रीच्या गाडीचा मोठ्याने आवाज सुरु झाला.



बँग!!


शर्यत सुरु करणाऱ्या माणसाने हवेत गोळी झाडली.


हेन्री आणि विंटनने आपापल्या गाड्या ट्रॅकवरून गाड्या पुढे हाकल्या.

लोक टाळ्या वाजवू लागले.

अधिकाधिक लोक विंटनसाठी टाळ्या वाजवत होते.

विंटनच रेस जिंकेल याची त्यांना पूर्ण खात्री होती.





दोन्ही गाड्या सारख्याच वेगाने धावत होत्या.

पहिल्या वळणानंतर विंटनची गाडी पुढे गेली. वळणावर न थांबता सफाईने गाडी पुढे कशी न्यायची हे विंटनला माहित होते.


परंतु हेन्रीला हे माहित नव्हते. त्याने इंजिन बंद केले आणि मग हळू हळू तो वळण पार करू लागला.


“बाहेर लटक,” हेन्री ओरडला.

धावत्या गाडीच्या फळीवर स्पायडर उभा राहिला.

तो बाहेर लटकला.

हेन्रीने टर्नला गाडी वळवली. स्पायडरच्या वजनामुळे गाडी उलटली नाही.






विंटन पुढे होता.

हेन्रीने गाडीचा स्पीड वाढवला.

तो वेगाने पुढे आला.

त्याची आणि विंटनची गाडी अगदी चिकटून धावत होत्या.

आणखी पाच वेळा गाड्या एकत्र आल्या.



गाड्यांची रेस अंतिम टप्प्यात पोचली.
अंतर नजरेच्या टप्प्यात आले.

आणि अचानक ट्रॅकवर काळ्या धुराचा ढग उडाला.

हेन्रीला समोरचे काहीही दिसत नव्हते.

त्याच्या गाडीत तर काही बिघाड झाला नाही ना?

इंजिन खूप तापले तर नाही ना?

स्वस्त गाडी बनवायचे स्वप्न धुरात विलीन झाली की काय?





नाही..


विंटनची गाडी खराब झाली होती. त्याच्या गाडीच्या इंजिनमधून धूर येत होता. आणि अचानक इंजिन बंद पडले.

गाडी काही केल्या पुढे जाईना.

हेन्री ओरडतच त्या धुरातून बाहेत आला.

“येSSयप्पी!!”

तो हर्षातिरेकाने ओरडला.






प्रेक्षक बेफाम झाले.

पुरुषांनी टोप्या हवेत उडवल्या.

बायका खुर्चीवर उभे राहून त्याला पाहू लागल्या.

हेन्रीने त्याची पहिलच रेस जिंकली होती.

हेन्री फोर्ड आता अमेरिकेचा नवीन कार रेसिंग चॅम्पियन ठरला होता.



दुसऱ्या दिवशी हेन्रीचे नाव आणि फोटो प्रत्येक वर्तमानपत्रात झळकला होता.

त्याला हजार डॉलरचे बक्षिस मिळाले होते.





त्याला एक क्रिस्टलचा पंच बाऊलही बक्षिस मिळाला होता.

क्लाराने तो बाऊल येणाऱ्या पाहुण्यांना पाहता यावा म्हणून टेबलवर ठेवला होता.





हेन्रीने त्याच्या स्वप्नातील कार बनवली.

त्याचे नाव मॉडेल टी असे ठेवले. सुरुवातीला ती फक्त काळ्या रंगाची बनवली गेली.

मॉडेल टी वापरायला अगदी सोपी होती.

तसेच तिची दुरुस्ती आणि देखभालही सोपी होती.

लोकांना ती खूपच आवडली.

त्यांनी तिचे नाव टीन लीझ्झी असे ठेवले.

हेन्री फोर्ड आपली टीन लीझ्झी घेऊन शहरात आला.

त्याला बघून लोक खूप खुश झाले.

महिलांनी हात हलवून स्वागत केले.

पुरुषांनी गाड्यांचे हॉर्न वाजवले.

हेन्री खूप आनंदी होता.

सर्वसामान्यांना परवडेल अशी गाडी त्याने बनवली होती.






ही एक खरी घटना आहे.

१० ऑक्टोबर १९०१ मध्ये कारची रेस झाली होती.

हेन्रीने बक्षिसाची रक्कम फोर्ड मोटार कंपनी सुरु करण्यासाठी वापरली.

हेन्री फोर्डची मॉडेल टी ही गाडी सामान्य लोक घेऊ शकत होते.



हा त्या रेसमधील प्रत्यक्ष घेतलेला फोटो आहे. हेन्री विंटनच्या गाडीला आता ओलांडणार आहे. तुम्ही तर फोटो अगदी नीट पाहिला तर स्पायडर तुम्हाला धावत्या गाडीच्या फळीवर उभा आहे.